# पणजीत 'बोट शो' सुरू



**पणजा – कापाल : बांदोडकर मैदानावर भरलेल्या आंतरराष्ट्रीय बोट शो प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या देश विदेशी बोटी.** उमेश बाणस्तारकर

## देशभरातील १०० बोटींच्या प्रतिकृतींचा समावेश

**▶ पणजी/ प्रतिनिधी**

गोव्यात आंतरराष्ट्रीय बोट शो (प्रदर्शन) कालपासून कांपाल–पणजी येथील बांदोडकर मैदानावर सुरू झाला असून त्यात भारतासह विविध देशातील १०० हून अधिक बोटींच्या प्रतिकृती (ब्रँड) यांचा समावेश आहे. गोमंतकीय जनतेला हा बोट शो म्हणजे एक पर्वणीच असून रविवार १७ जानेवारीपयत शो पाहण्यासाठी जनतेला खुला आहे.

'ट्रिनिटी' या आयएसओ २००१–२००० प्रमाणपत्रधारक कंपनीतर्फे अनेकांच्या सहकार्याने आणि संयुक्त विद्यमाने त्याचे आयोजन करण्यात आले असून तो पाहण्यास लोकांची गर्दी होत आहे. 'गोवा इंटरनॅशनल बोट शो' असे त्याचे नामकरण असून ऑस्ट्रेलिया, जर्मनी, चीन, फ्रान्स, इटली, न्युझीलंड, थायलंड, कोरीया, युके, युएई, युएसए या देशातील नामवंत कंपन्यांच्या बोटीचे ब्रँडस त्यात समाविष्ट आहेत.

सरकार व विविध उद्योगांनी या बोट शोसाठी सहकार्य केले असून अनेक लहान मोठ्या बोटीचे प्रदर्शन त्यात मांडलेले आहे. इंडियन नेव्ही, इंडियन कोस्ट गार्ड, यारिंग असोसिएशन ऑफ इंडिया, गोवा टुरीझम, गोवा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्री, गोवा ट्रॅव्हल्स आणि टुरीझम असोसिएशन, गोवा बार्ज ओनर्स असोसिएशन, गोवा सरकार, गोवा मिनरल फाऊंडेशन इत्यांदीच्या सहकार्याने हा बोट शो गोव्यात घेण्यात आला आहे. देशातील हा सर्वात मोठा बोट शो असून गोव्यात जलपर्यटन वाढावे म्हणून त्याची आखणी करण्यात आल्याची माहिती आयोजक कंपनीतर्फे देण्यात आली. अनेक सागरी बोटी जवळून पाहण्याची, न्याहाळण्याची सुवर्णसंधी त्यामुळे गोमंतकातील जनतेला चालून आली असून सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळेत हा शो अर्थात प्रदर्शन पाहण्यासाठी खुले आहे. या बोटीच्या खरेदी–विक्रीसाठी खास पॅकेज– सवलती देण्यात आल्या असून अनेक देशातील नामवंत कंपन्या त्यात सहभागी झाल्या आहेत.

गोव्यात दरवर्षी होणारा हा एक प्रमुख बोट शो असून त्यात देश–विदेशातील नामांकित बोट उत्पादक कंपन्या भाग घेतात. यंदा प्रदर्शनाचे सहावे वर्ष असून जलवाहतूक जलपर्यटनाबरोबर बोट व्यावसायिकांसाठी ते महत्त्वाचे आहे.

### महिंद्रा ओडिसीतर्फे २२ फूट फायबरग्लास पॉवरबोट

महिंद्रा उद्योग समुहाचा एक भाग असलेल्या महिंद्रा ओडिसीतर्फे गोवा आंतरराष्ट्रीय बोट शोमध्ये २२ फूट फायबरग्लास पॉवरबोटचे प्रदर्शन करण्यात आल्याची माहिती कंपनीचे सीईओ धीरेश शर्मा यांनी पत्रकारपरिषदेत दिली.

वाहन निर्मिती क्षेत्रातील सर्व विभागात स्थान मिळविलेल्या महिंद्रा समुहाच्या दर्जाला साजेशी ही महिंद्रा ओडिसी बोट आहे. भारताचा विस्तीर्ण समुद्रकिनारा हा जलवाहतूक व सागरी पर्यटनासाठी मोलाचा ठरत आहे. महिंद्रा ओडिसीच्या माध्यमातून महिंद्रा समुह बोटनिर्मितीबरोबरच सागरी पर्यटनाला प्रोत्साहन. देण्यासाठी कार्यरत आहे. महिंद्रा ओडिसी फेब्रुवारी २००९ मध्ये स्थापन झाली असून अल्पावधीतच भारतातील प्रमुख आरामदायी बोट उत्पादक कंपनी म्हणून ओळखली जात आहे. या प्रदर्शनात महिंद्रा ओडिसी २२ ही १५ लाख रुपये किमतीची असून महिंद्रा ओडिसी ही बोट ६० लाख रुपयांची आहे.